कार्यालय पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा
मुख्य बि.एस.एन.एल. ऑफीस समोर, सिव्हील लाईन, वर्धा
दुरध्वनी क्र. 07152–243844 ई.मेल–acbwardha@gmall.com

# प्रेस नोट

दिनांक 16.02.2026

तक्रारदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता तहसिल कार्यालय,समुद्रपुर जि.वर्धा यांना नगर पंचायत समुद्रपुर यांना आदेशीत करण्याकरीता केलेल्या अर्जावर नगरपंचायत समुद्रपुर यांचा आदेश काढुन देण्याकरीता यातील आलोसे यांनी तकारदार यांना ५०००/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती २०००/-रू. पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडुन स्विकारतांना रंगेहाथ मिळुन आले आहे.

| | |
|---|---|
| **आलोसे यांचे नाव** | श्री. प्रशांत केशव नंदेश्वर, वय ४५ वर्षे, पद-महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय,समुद्रपुर जि.वर्धा रा.श्रीकांत पाणेकर यांचे घरी, पाणेकर ले-आऊट, बस स्टॉप समोर, समुद्रपुर ता.समुद्रपुर ,जि.वर्धा वर्ग-३ |
| **गुन्हा घटना ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १६.०२.२०२६ चे १३.२४ वा. ते १४.२३ वा. दरम्यान तहसिल कार्यालय,समुद्रपुर ता.समुद्रपुर, जि.वर्धा आलोसे यांचे कक्षात |
| **लाचेची रक्कम** | मागणी ५०००/-रू.तडजोडीअंती २०००/-रु. स्वीकारले. |

हकीकत याप्रमाणे आहे की, तक्रारदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने नगर पंचायत, समुद्रपुर येथे गेला असता त्यांची जन्म नोंद न मिळुन आल्याने त्यांना जन्माची नोंद होणे करीता तहसिल कार्यालय, समुद्रपुर यांची आदेश प्रत आणणे करीता सांगितले होते. यावरून तक्रारदार हे तहसिल कार्यालय, समुद्रपुर येथे जन्म नोंद होणे बाबत आदेश प्रत आणणे करीता आलोसे यांचे कडे गेले असता नमुद आलोसे यांनी जन्म नोंद आदेश काढणे करीता तक्रारदार यांना ५०००/-रू. ची लाच मागणी केली होती. यावरून दिनांक १६.०२.२०२६ रोजी शासकिय पंचासमक्ष लाच मागणी कार्यवाही केली असता आलोसे श्री. प्रशांत नंदेश्वर यांनी तक्रारदार यांना आता २०००/-रुपये लागतील व काम झाल्यावर ३,०००/-रूपये द्यावे लागतील असे म्हणुन एकुण ५,०००/-रूपये लाच रकमेची मागणी केल्याचे पडताळणी कार्यवाहीत दिसुन आल्याने आलोसे यांचेवर लाच सापळा कार्यवाही केली असता नमुद आलोसे श्री. प्रशांत नंदेश्वर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वत: चे आर्थिक फायदया करीता, स्वत: आलोसे यांना आदेश पारीत करण्याचा अधिकार नसतांना, तक्रारदार यास आलोसे यांना आदेश पारीत करण्याचा अधिकार असल्याचे भासवुन, तक्रारदार यांचे कडुन तडजोडीअंती २,०००/-रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळुन आल्याने त्यांना लाचेचे रकमेसह पो.नि. संदिप मुपडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा व सापळा कार्यवाही पथकाने रंगेहाथ पकडले व अंगझडती घेतली असता लाच रक्कम २,०००/-रू. व एक अॅसुस कंपनीचा मोबाईल मिळुन आला.

आलोसे यांचे कृत्य कलम ७अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन अधिनियम सन- २०१८) अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचे विरूध्द पो.स्टे. समुद्रपुर, जि.वर्धा येथे उपरोक्त गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

आलोसे श्री. प्रशांत केशव नंदेश्वर , वय ४५ वर्षे, पद-महसुल सहाय्यक,तहसिल कार्यालय,समुद्रपुर जि.वर्धा रा. श्रीकांत पाणेकर यांचे घरी पाणेकर ले-आऊट ,बस स्टॉप समोर, समुद्रपुर ता.समुद्रपुर ,जि.वर्धा वर्ग-३ यांचे वर पोलीस स्टेशन समुद्रपुर, जि.वर्धा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. दिगांबर प्रधान, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर श्रीमती माधुरी बाविस्कर, अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर यांचे मार्गदर्शनात पर्यवेक्षक अधिकारी राकेश साखरकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. वर्धा, सापळा अधिकारी श्री. संदिप मुपडे, पोलीस निरिक्षक, व श्रीमती कान्होपात्रा बन्सा, ला.प्र.वि. वर्धा व पथकातील सफौ/मंगेश गंधे, पो.हवा./सचिन गाडवे, पंकज डाहाके, मपो.हवा./राखी फुलमाळी, पो.कॉ./प्रितम इंगळे, प्रशांत मानमोडे, मनिष मसराम, लक्ष्मण केंद्रे,विष्णु काळुसे मपोशि/अश्विनी भानखेडे व चालक स.फौ. गणेश मेश्राम सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ला.प्र.वि. वर्धा यांनी केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा कडुन आव्हान करण्यात येते की, कोणी लोकसेवक स्वत: अगर इतरां मार्फत शासकिय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास टोल फ्रि कमांक १०६४, दुरध्वनी क्र. ०७१५२-२४३८४४ व व्हॉटस ॲप मोबाईल क. ७५१७६११०६४ व पोलीस उपअधिक्षक, मो.क.७३५०९०२१०० वर संपर्क करावा. तसेच आमचे ई.मेलacbwardha@gmail.comवर तक्रार करावी.

(संदीप मुपडे)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा

CamScanner